**निशाणी क्र. ४३ लगत**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.४ यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. सावंत यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

२. दत्तात्रय देशपांडे यांनी चिंतले कुटुंबाला जमीन कोणत्या वर्षी दिली, हे मला सांगता येणार नाही. कोणत्या सर्वे नंबरमधील जमीन दिली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद चिंतले यांना ३ एकर जमीन दिली, ही माझी ऐकीव माहिती आहे. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा मला वादीने दाखविला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ७/१२ उताऱ्यावर वादी, प्रतिवादी क्र.१ व बाबूराव यांची नावे नोंद आहेत. नागनाथ व गोपीनाथ यांनी जमीन कोणत्या वर्षी विक्रीस काढली, ते मला सांगता येणार नाही. वैजनाथ व गोपीनाथ यांच्यातील व्यवहारास साक्षीदार म्हणून मी उपस्थित नव्हतो. सदर व्यवहाराची माहिती मला मिळाल्यानुसार ती माहिती मी शपथपत्रात नमूद केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत आहे.

३. प्रतिवादी क्र.२ ने वादीस किती तारखेला अडवाअडवी केली, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद हयात असताना त्याने त्याच्या तीन मुलांना दावा मिळकत वाटून दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या वाटणीप्रमाणे प्रत्येकजण आपआपल्या हिस्स्यात कब्जा वहिवाट करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.07.14 18:23:33 +0530

उदगीर
दिनांक – १४/०७/२०२६

**(के. ए. यादव)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर